# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०३/०४/२०२५ (गुरूवार)**

---

## अंमलीपदर्थाची विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक ०२/०४/२०२५ रोजी पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. बोरी परीसरात स्थानिक गुन्हे शाखा चे पथक पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली कि, टाकळघाट येथे राहणारा इसम शकील जब्बार शेख हा त्याचे राहते घराचे समोरील पार्किंग शेड मध्ये अंमली पदार्थ गांजाची विक्री करतो. मिळालेल्या महीतीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी जावुन सापळा रचुन अरोपी **शकील जब्बार शेख, वय ४५ वर्ष, रा. वॉर्ड न.०३, टाकळघाट, ता. हिंगणा, जि नागपुर** याला ताब्यात घेतले आणि नमुद आरोपीचे ताब्यातुन ८३८ ग्राम अंमली पदार्थ गांजा, किंमती ८५००/— रुपये २) एक थैली कि ५/— रुपये असा **एकुण ८५०५/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे.**

आरोपी नामे शकील जब्बार शेख, वय ४५ वर्ष, रा. वॉर्ड न.०३, टाकळघाट, ता. हिंगणा, जि. नागपुर याच्या विरूध्द एन डी पी एस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास एम.आय.डी.सी. बोरी पोलीस करत आहे.




## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन बोरी** :— दिनांक ०२/०४/२०२५ रोजी बोरी पोलीस रात्रगस्त करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की बोलेरो पिकअप **एम.एच.३१.एफ.सी. २४८९** वाहनामध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी उमरेड बायपास येथे नाकाबंदी केली असता संशयीत बोलोरो पिकअप एम.एच.३१.एफ.सी. २४८९ हे वाहन येताना दिसले पोलीसांनी चालकाला वाहन थांबविण्याबाबत इशारा केला असता आरोपी चालक वाहन न थांबविता पळुन गेला. पोलीसांनी नमुद वाहनाचा पाठलाग केला असता धवळपेठ पुलाजवळ वाहन रोडच्या कडेला थांबवुन आरोपी चालक आंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला. पोलीसांनी वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये ६ गोवंश जनावरे अंत्यत दाटीवाटीने कमी जागेत बाधुंन , निर्दयते कोंबुन, चारापाण्याची सोय न करता वाहतुक करतांना मिळुन आले . **पोलीसांनी पंचासमक्ष एक बोलोरो पिकअप एम.एच.३१.एफ.सी. २४८९ किंमती २,५०,०००/— रूपये. व ६ गोवंश जनावरे किंमती १,०२,००० /— रूपयाचा एकुण किंमती ३,५२,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

आरोपी **बोलेरो पिकअप एम.एच.३१.एफ.सी. २४८९ चा चालक** याच्या विरूध्द कलम ११(१)(ए) (डी) (ई) प्रा. छ. अधि, सहकलम ५(ए), ९ महा. प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## पोस्टे कन्हान हद्दीत ५२ तासपत्ते खेळणाऱ्या १३ आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान यांची कारवाई

दिनांक ०२/०४/२०२५ रोजी श्री संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान हे त्यांच्या पथकासह पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, मुकेश यादव याचे शेतात डुमरी शिवार कन्हान येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे.मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता आरोपी नामे **१**.शेख अकील शेख सुल्लतान बाबा शेख, वय ३५ वर्षे ,रा. कादर झेंडा जवळ, कामठी नागपुर **२.** रजा उल्ला मोईन अली अहमद असारी, वय ५१ वर्षे, रा. हाकी बिल्डींग च्या मागे, कामठी, **३.** सुरेन्द्र ओमकार यादव, वय ४४ वर्षे , रमा नगर, कामठी **४.** पंकज रंजित समुद्रे, वय ३० वर्षे , रा. शनि मंदीर,जुनी कामठी रोड कळमना नागपुर ,**५.** ईस्माइल ईसराईज खान, वय ५५ वर्षे ,रा रूईगंज कामठी, **६.** जितेन्द्र मधन विश्वकर्मा, वय ४२ वर्षे ,रा कळमना नागपुर ,**७.** अजहर जाफर खान, वय ३६ वर्षे , रा. शान्तीनगर कॉलनी, नागपुर **८.** आहाद अहमद खान, वय ३३ वर्षे , रा. कळमना वस्ती ,नागपुर **९.** शेख रेयाज शेख अकबर कुरेशी, वय ४१ वर्षे , रा. जुनीकामठी रोड ,कळमना नागपुर **१०.** अल्तमास अहमद कदीर अहमद, वय ३२ वर्षे , बोरी लाईन कामठी **११.** शेख समीर शेख शकील, वय ३२ वर्षे ,रा. यशोधरा नगर नागपुर **१२.** मुकेश रूपचंद यादव, वय ५५ वर्षे , रा. यादवनगर कामठी **१३.** मन्साराम हिरालाल जिटे, वय ३९ वर्षे , रा. शिरपुर , ता. कामठी हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. **आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तास पत्ते ,रोख रक्कम २४६५/—रूपये , ७ ॲन्ड्रॉईड फोन, एक होन्डा मोटर सायकल क्र एम एच ४० डी. ३९१८ आणि एक ऑटो रिक्षा एम एच ४९ ए.आर २०७२ असा एकुण रोख रक्कम १,०४,४६५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे १२(अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**